


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक १८, रविवार १ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# थोरातांचा पराभव : विखेंचे श्रेय की अपयश?

## मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेतील उमेदवाराचा पराभव हा संगमनेरला शाप

संगमनेरमधील काँग्रेसचे उमेदवार ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचा पराभव नगर जिल्हयाच्याच नव्हे तर उभ्या महाराष्ट्राच्या पचनी पडलेला नाही. त्यांच्या पराभवाबाबत अगदी विरोधी पक्षाच्या नेत्यांनी हळहळ व्यक्त केली हे अजित पवार यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते. यासंदर्भात भाजपाचे नेतेही सखेद आश्चर्य व्यक्त करतात.

भाजपातील विखे पिता-पुत्र या पराभवाचे राजकीय श्रेय घेऊन




नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील उटटे काढल्याची शेखी मिरवतात. तशी त्यांची प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष वक्तव्ये येतात. नवनिर्वाचित आमदार खताळ त्यांना श्रेय जरूर देतात. हा राजकीय उपकाराचा भाग झाला. पण वास्तवता वेगळी दिसते. खताळांच्या आमदारकीची लॉटरी लागली. त्याची कारण मिमंसा वेगळी होऊ शकते. त्यात विखे पिता-पुत्रांचा सहभाग असू शकतो. पण त्यांना संपूर्ण श्रेय घेता येणार नाही. त्यांना ऐवढी विजयाची खात्री होती तर भाजपाच्या खताळ यांना शिवसेना शिंदे पक्षाची उमेदवारी घेण्याऐवजी डॉ. सुजय विखे यांनीच ही उमेदवारी का घेतली नाही ? तासगांवच्या पाटलांनी भाजपा ऐवजी राष्ट्रवादीची उमेदवारी घेतली.

विखे यांनी लोकसभा निवडणूकीच्या पराभवानंतर टायगर अभी जिंदा है अशा राणा भीमदेवी थाटात घोषणा दिल्या. मग तासगांव पॅटर्न संगमनेरात का वापरला नाही ? धांदरफळ प्रकरणाने भेदरलेल्या विखेंनी संगमनेरची शिवसेनेची उमेदवारी खताळांच्या माथी मारली मग ज्यांनी मैदान सोडून पळ काढला, त्यांनी विजयाचे श्रेय घेणे कितपत संयुक्तिक ठरते ? सकृतदर्शनी हे श्रेय नसून राजकीय अपयश दिसते.



### मुख्यमंत्रीपदाचा शाप

स्वातंत्रोत्तर प्रारंभीच्या काळात संगमनेर हा कम्युनिष्ट पक्षाचा बालेकिल्ला आणि पुरोगामी विचार सरणीचा तालुका संबोधला जायचा. ही राजकीय संस्कृती कॉ. दत्ता देशमुख आणि सामाजवादी भास्करराव दुर्वे यांनी रूजविली. ती भाऊसाहेब थोरात आणि बी.जे. खताळ पाटील यांनी जोपासली. विशेष म्हणजे पन्नासच्या दशकात कॉ. दत्ता देशमुख यांचा राज्याच्या राजकारणात प्रचंड प्रभाव होता. ते १९५२ आणि १९५७ च्या विधानसभा निवडणूकीत संगमनेर-अकोले मतदारसंघात आमदार होते. त्यावेळी दिल्लीतील काँग्रेस हायकमांडने कॉ. दत्ता देशमुख यांना काँग्रेस प्रवेशाचे आमंत्रण देऊन मुख्यमंत्री पदाची ऑफर दिली होती. कॉ दत्ता देशमुख यांनी ही ऑफर नम्रपणे नाकारून आपला कम्युनिस्ट बाणा कायम ठेवला. पण १९६२ च्या विधानसभा निवडणूकीत त्यांचा संगमनेर विधानसभा मतदारसंघात पराभव झाला. त्यावेळी काँग्रेसचे बी.जे. खताळ पाटील हे विजयी झाले. तब्बल ६२ वर्षांनी त्याचा राजकारणाची तशी पुनरावृत्ती होउन संभाव्य मुख्यमंत्रीपदाचे दावेदार बाळासाहेब थोरात हे अमोल खताळ यांच्याकडून पराभूत झाले. कारणमिमंसा काही  असो पण मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार संगमनेरमध्ये पराभूत होतात, हा राजकीय शाप दुर्लक्षून चालता येणार नाही.

### थोरात-विखे तुलना फिजूल

विद्यमान राजकारणात थोरात-विखे तुलना तशी फिजूल ठरते. पक्षीय पातळीवर विचार केला तर भाजपात विखेंचे नाव मुख्यमंत्रीपदाच्या स्पर्धेत आजून तरी आले नाही. याउलट काँग्रेस पक्षाचे मुख्यमंत्री पदाचे जे संभाव्य उमेदवार होते त्यात बाळासाहेब थोरात यांच्या नावाची अग्रक्रमाने चर्चा होत होती. त्यांच्या राज्यामध्ये काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ विविध ठिकाणी जाहिर सभा झाल्या ही वस्तुस्थिती आहे. याउलट राधाकृष्ण विखे ज्येष्ठ मंत्री असून सुध्दा त्यांच्या राज्यात प्रचारासाठी सभा झाल्या नाहीत.त्यांनी श्रीरामपूर, संगमनेर, कोपरगांवात सभा घेतल्या पण नगर दक्षिणेत सुध्दा त्यांनी प्रचार सभा घेतल्याचे ऐकिवात नाही. ते शिरडी मतदारसंघापुरतेच मर्यादीत झाले होते. मग विखे-थोरात अशी तुलना कशी होणार ?

### साहेब गाव पुढारी बदला

कारणमीमंसा काही असली तरी बाळासाहेब थोरात यांचा पराभव झाला असून हा जनादेश स्वीकारावा लागेल. थोरात यांनी पहिल्यांदाच संगमनेरकडे दुर्लक्ष करून राज्यस्तरावर लक्ष केंद्रीत केले. त्याचा हा दृष्य परिणाम दिसतो. पण हे करताना त्यांच्या पक्षीय समर्थकांची स्थानिक मंडळी गाफिल राहिली. साहेब निवडूनच येणार हा त्यांचा गाफिलपणा नडला. त्याची बाळासाहेब थोरात यांना मोठी राजकीय किंमत चुकवावी लागली. थोरातांचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि नेते आता सक्रिय नाहीत. नवीन कार्यकर्त्यांनी ज्या पध्दतीने निवडणूक यंत्रणा हाताळणे आवष्यक होते त्यात त्रुटी होत्या. थोरातांची स्वतःची यंत्रणा भ्रमात होती. त्यात संगमनेरमध्ये पाच वर्षे हिंदुत्वाचा जो प्रचार झाला, त्याकडे दुर्लक्ष झाले. कत्तलखान्याचे प्रकरण ज्या पध्दतीने हाताळले त्यातून नाराजी आली. आता साहेबांना गाव पुढारी बदलून यंत्रणा सक्रिय करावी लागेल आणि ठाण्यात जितेंद्र आव्हाड यांनी पाहिल्या दिवसापासून ईव्हिएमवर लक्ष दिले होते तसेच आता थोरातांसह सर्वांनाच द्यावे लागेल. ईव्हिएम काँग्रेसच काय विरोधकांना सुधारून देणार नाही.

### वडिल अलिप्त तरीही विजयी

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात संगमनेर विधानसभा मतदारसंघात सलग आठ वेळा निवडून येऊन आमदार आले. सात वेळा ते काँग्रेसच्या तिकीटावर आमदार झाले तर १९८५ च्या पहिल्या निवडणूकीत ते अपक्ष लढले आणि निवडणूकीनंतर ते काँग्रेसमध्ये सक्रिय झाले. नगर जिल्हयातील थोरात घराणे असे आहे की, त्यांनी कम्युनिस्ट पक्षातून काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर गेल्या ७५ वर्षात पक्षाची साथ सोडलेली नाही. किंवा इतर राजकीय पुढाऱ्यांप्रमाणे पक्षांतर केले नाही. १९८५च्या विधानसभा निवडणूकीत काँग्रेस पक्षान भाउसाहेब थोरात यांना उमेदवारी नाकारल्यामुळे बाळासाहेब थोरात अपक्ष लढले आणि विजयी झाले.काँग्रेसने त्यावेळी मंचरच्या शकुंतला थोरात यांना उमेदवारी दिली होती. पण त्या काळातही भाऊसाहेब थोरात राजकारणापासून अलिप्त राहिले त्यांनी पुत्र बाळासाहेब थोरात यांचा उघड प्रचारही केला नव्हता. वडिल अलिप्त राहिले तरी बाळासाहेब थोरात प्रचंड मतांनी विजयी झाले होते. त्या काळातही काँग्रेस नेते म्हणून बाळासाहेब विखे पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारात सक्रीय होते. हा राजकीय इतिहास राजकीय निरीक्षकांना दुर्लक्षून पुढे जाता येणार नाही. बाळासाहेब विखे नगर दक्षिणमधून पराभूत झाले होते पण त्यांनी पराभवाचे खापर कोणावरही फोडले नव्हते. कोर्टाच्या माध्यमातून त्यांनी आपला करीष्मा दाखविला होता. पण त्यांचे नातू डॉ. सुजय विखे हे त्यांच्या पराभवाला बाळासाहेब थोरात यांना जबाबदार धरून राजकीय बदला घेतल्याच्या डरकाळया फोडत आहेत. संगमनेरमधून विखेंनी शिंदे सेनेचा उमेदवार निवडून आणला मग श्रीरामपूरमध्ये महायुतीचा उमेदवार पराभूत कसा झाला ? त्या पराजयाचे उत्तरदायित्व विखे का स्विकारत नाहीत ?

# क्रीडा संकुलांसाठी ४५ कोटी निधीची मागणी

## मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांना खा. नीलेश लंके यांचे पत्र



■ वाडियापार्कसह विविध तालुक्यांतील क्रीडा संकुलांसाठी ४५ कोटी रूपयांचा निधी देण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्याकडे केली.

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**नगर शहरातील वाडिया पार्क साठी वीस कोटी तर पारनेर, श्रीगोंदे, कर्जत, जामखेड व शेवगांव या तालुक्यांतील क्रीडा संकुलांसाठी प्रत्येकी पाच कोटींच्या निधीची मागणी खा. लंके यांनी केली असून हा निधीही मार्च महिन्यात मंजुर करण्याची ग्वाही केंद्रीय श्रम, रोजगार, युवा कार्यक्रम तथा खेळ मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिल्याचे खा. नीलेश लंके यांनी सांगितले.**

नगर शहरातील वाडिया पार्क तसेच विविध तालुक्यांतील क्रिडा संकुल किंवा त्यात सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खा. लंके यांनी नवी दिल्ली येथे खा. भास्कर भगरे यांच्यासह मंत्री मांडविया यांची भेट घेतली. यासंदर्भात लंके यांनी मांडविया यांना दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, नगर शहरातील वाडिया पार्क हे जिल्हयातील एकमेव प्रमुख क्रीडा संकुल आहे. या संकुलामध्ये अनेक सुविधांची आवष्यकता असून काही सुविधांअभावी विस्तृत आणि मोठे क्षेत्रफळ असूनही या संकुलापासून खेळाडू उपेक्षित राहत आहेत. वाडिया पार्क विकसीत करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्यास एक गुणवत्तापुर्ण क्रीडा संकुल उभे राहील. त्या माध्यमातून विविध खेळांना प्रोत्साहन मिळू शकेल असा विश्वास खा. लंके यांनी व्यक्त केला आहे.

नगर शहराबरोबरच पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगांव या तालुक्यांमधील क्रीडा संकुलांमध्येही विविध सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे क्रीडा संकुल असूनही ग्रामीण भागातील खेळाडूंना त्याचा लाभ घेता येत नाही. मंत्री मांडविया यांनी या मागणीचा विचार करून निधी मंजुर करण्याची मागणी खा. लंके यांनी यावेळी केली. खा. लंके यांच्या मागणीचा विचार करून येत्या मार्च महिन्यात ४५ कोटींच्या निधीला मंजुरी देण्याची ग्वाही मंत्री मांडविया यांनी दिल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

# मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांची वर्णी

## ■ ५ डिसेंबरला आझाद मैदानावर शपथविधी ■ भाजपाच्या ज्येष्ठ नेत्याची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांचीच वर्णी लागणार असल्याची माहिती भारतीय जनता पक्षातील एका ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्र्यांनी प्रसारमाध्यमांना दिली आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी ५ डिसेंबर रोजी दुपारी एक वाजता आझाद मैदानावर होणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली आहे. या संदर्भात सर्व तयारी ही पूर्ण झाली असल्याची माहिती देखील त्यांनी दिली आहे.**



विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतरही राज्यात अद्याप सरकार स्थापन झालेले नाही. सध्या एकनाथ शिंदे हेच काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कारभार पाहत आहेत. मात्र महायुतीतील चर्चा अद्याप संपलेली नसल्याने सत्ताधारी पक्षांमधील समन्वयावर विरोधकांच्या वतीने प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मात्र, यातच आता देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागणार असल्याची माहिती विश्वासनीय सुत्रांकडून मिळाली आहे.

**मुख्यमंत्री कोण?**

राज्याच्या मुख्यमंत्रीपदी कोणाची वर्णी लागणार याबाबत तर्क वितर्क उर्वरीत पान ३ वर

# माझ्या कुटुंबातील चार मतं कुठे गेली?

## ईव्हीएमवर शंका व्यक्त करत अपक्ष उमेदवाराचा सवाल

**कोपरगाव: प्रतिनिधी**

**राज्यात विधानसभा निवडणुकीचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून महायुतीला घवघवीत यश मिळाले असून महाविकास आघाडीची मोठी हार झाली आहे. निकालानंतर अनेक उमेदवारांनी ईव्हीएम मशीनबाबत शंका उपस्थित केली असून अनेकांनी फेर मतमोजणीची मागणी केली आहे. अशातच नगर जिल्ह्यातील २१९ कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवाराने ईव्हीएम मशीन बाबत शंका व्यक्त करत स्वतःच्या कुटुंबातील चार मते गेली कुठे? असा सवाल उपस्थित करत ईव्हीएम मशीनबाबत शंका उपस्थित करत यंत्रणेबाबत जाहीर नाराजी व्यक्त केली आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की नगर जिल्ह्यातील कोपरगाव विधानसभा मतदारसंघात पोहेगाव येथील रहिवाशी चंद्रहंस अण्णासाहेब औताडे अपक्ष



निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. त्यांचे निवडणूक चिन्ह जहाज होते. त्यांना निवडणुकीत एकूण १८२ मतं मिळाली. मतदारसंघातील बूथ क्रमांक २२२ मध्ये चंद्रहंस औताडे यांच्या संपूर्ण कुटुंबीयांनी मतदानाचा हक्क बजावला आणि संपूर्ण कुटुंबातील सात मतदान जहाज या चिन्हावर झाल्याचा दावा अपक्ष उमेदवार औताडे यांनी केला असून सात पैकी फक्त तीनच मतं त्या बुथवर दाखवत असल्याने इतर चार मते गेली कुठे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

त्याचबरोबर रांजणगाव देशमुख येथील बूथ क्रमांक २७० मध्ये माझी पुतणी आणि तिच्या घरच्यांनी एकूण तीन मत मला जहाज या चिन्हावर दिली असल्याचा दावा देखील त्यांनी केला असून तेथे तर शून्य मतं मिळालेली आहे. मग ती तीन मते गेली कुठे? असा देखील सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. सदर मते गेली कुठे याचं उत्तर निवडणूक आयोगाने मला द्यावं अशी अपेक्षा औताडे यांनी व्यक्त केली आहे. संदीप वर्पे यांनी अपक्ष उमेदवार चंद्रहंस औताडे यांच्या बूथवर फेर मतमोजणीची मागणी केली असल्याने निवडणूक आयोग आता काय निर्णय घेणार हे पाहणं महत्त्वाचं असेल.

**आम्हाला फेर मतमोजणीचा अधिकारच नाही**

ज्यावेळेस मी बुथवाईज आकडेवारी पाहिल्यानंतर माझ्या लक्षात आलं की माझ्या कुटुंबातील ४ मते कमी आहे. त्यामुळे मी निवडणूक आयोगाकडे तक्रार करण्यास गेलो असता तेथील अधिकाऱ्यांनी सांगितलं की तुम्हाला फेर मत मोजणीसाठीचा उर्वरीत पान ३ वर

# मॅच फिक्सिंगमुळे दक्षिण आफ्रिकेची लाज गेली!

## तीन खेळाडूंना अटक । क्रिकेट विश्वात खळबळ



**मुंबई :प्रतिनिधी**

**क्रिकेट विश्वातून मोठी आणि खळबळजनक बातमी समोर आली आहे. दक्षिण आफ्रिकेचे तीन खेळाडू मॅच फिक्सिंगच्या जाळ्यात अडकले आहेत. आफ्रिकेसाठी क्रिकेटचे मैदान गाजवणाऱ्या आणि वन डे क्रिकेट जगात नंबर वन ठरलेल्या खेळाडूलाही या प्रकरणात अटक झाल्याने खळबळ उडाली आहे. आफ्रिकेच्या एकूण तीन खेळाडूंना अटक करण्यात आली आहे.**

**नेमकं काय आहे प्रकरण?**

२०१५-१६ रामस्लॅम आणि टी-२० मॅच फिक्सिंग प्रकरणामध्ये अटक झाली आहे. दक्षिण आफ्रिकेचे थामी सोलेकिल, लोनावो त्सोटोबे आणि एथी मबालाती या माजी खेळाडूंना अटक झाली आहे. तिघांवर २००४ च्या कलम १५ अंतर्गत भ्रष्टाचाराचे पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यांच्यावर लाच घेतल्याचा किंवा दिल्याचा आरोप आहे. तिन्ही खेळाडूंवर फिक्सिंगचा आरोप केला उर्वरीत पान ३ वर



# शिवार

## स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# कांदा लागवड तंत्रज्ञान



## जमीन

पाण्याचा उत्तम निचरा होणारी हलकी ते मध्यम भारी जमीन निवडावी. जमिनीच्या सामू ६.५ ते ७ च्या दरम्यान असावा. हलक्या, मुरमाड जमिनीत सेंद्रिय खतांचा वापर केल्यास चांगले उत्पादन मिळते. भारी चिकणमाती असलेल्या, पाण्याचा निचरा न होणाऱ्या तसेच चोपण किंवा खारवट जमिनीत रोपांची वाढ खुंटते, पीक चांगले पोसत नाहीत, अशा जमिनीत लागवड करू नये. खरीप लागवडीसाठी भारी जमीन निवडू नये.

## बियाणे निवड

खरिपाच्या जातीचे बी दोन खरीप हंगामाकरिता वापरता येते. बियाणे साधारणपणे एप्रिल-मे महिन्यात तयार होते. ते लगेच जून महिन्यात वापरले जाते. काही कारणाने बी विकले गेले नाही तर पुढच्या वर्षी खरीप हंगामात वापरता येते. रब्बीच्या जातीचे बियाणे फक्त एकाच रब्बी हंगमासाठी वापरता येते. बियाणे एप्रिल-मे महिन्यात तयार झाल्यानंतर ते येणाऱ्या रब्बी हंगामासाठी वापरावे लागते. पुढचा रब्बी हंगाम १८ महिन्यानंतर येतो. बियाणे जर चांगले ठेवले नसेल तर ते उगवत नाही.

## रोपवाटिका

एक हेक्टर कांदा लागवडीसाठी १० ते १२ गुंठे जमीन रोपवाटिका करण्यासाठी लागते. रोपवाटिकेसाठी जागा विहिरीजवळ असावी. म्हणजे वेळच्या वेळी पाणी देणे सोपे होते. लव्हाळा,हरळी असणारी तसेच पाणी साचणारी सखल जमीन रोपवाटिकेसाठी निवडू नये. रोपवाटिका नेहमी स्वच्छ सूर्यप्रकाश मिळेल अशा जागी करावी. तणाची वाढ होण्याची शक्यता असल्यास किंवा शेणखतांमधून तण येण्याची शक्यता असल्यास बियाणे पेरण्यापूर्वी वाफे भिजवून घ्यावेत. तणाचे बी उगवून आल्यानंतर खुरपणी करून बियाणे पेरावे. रोपे गादी वाफ्यावर तयार करावीत. गादीवाफ्यावर रोपांची वाढ एकसारखी होते. मुळांच्या भोवती पाणी फार काळ साचून राहत नाही. त्यामुळे रोपे कुजत नाहीत. लागवडीच्या वेळी रोपे सहज उपटून काढता येतात. रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. गादी वाफे एक मीटर रुंद, तीन ते चार मीटर लांब करावेत. वाफ्याची उंची १५ सेंमी ठेवावी. गादीवाफे नेहमी उताराला आडवे करावेत. वाफे तयार करताना प्रत्येक वाफ्यात दोन घमेली चांगले कुजलेले शेणखत आणि ५० ग्रॅम मिश्र खत मिसळावे, तसेच अर्धा ग्रॅम ट्रायकोडर्मा प्रति वर्गमीटर या प्रमाणात वाफ्यात चांगल्या कुजलेल्या शेणखताबरोबरीने मिसळावे. खते आणि वाफ्यातील माती मिसळून त्यावरील दगड किंवा बारीक ढेकळे वेचून घ्यावीत. वाफा सपाट करावा. रुंदीशी समांतर चार बोटे अंतरावर रेघा पाडाव्यात. त्यात बियाणे पातळ पेरून मातीने झाकावे. नंतर झारीने पाणी द्यावे. पाणी जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पद्धतीने द्यावे. बियांची उगवण क्षमता चांगली असेल तर एक हेक्टर लागवडीसाठी सात किलो बियाणे पुरेसे होते. साधारणपणे प्रत्येक चौरस मीटरवर १० ग्रॅम बी पेरावे, म्हणजे एका वाफ्यावर ३० ग्रॅम बी पेरावे. पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाणास २.५ ते ३ ग्रॅम थायरम किंवा कॅप्टन किंवा कार्बेन्डाझिमची प्रक्रिया करावी. बी पेरल्यानंतर शक्यतो पहिले पाणी झारीने द्यावे म्हणजे बियाणे जागच्या जागी राहते; परंतु वाफ्याचे एकूणच प्रमाण जास्त असल्याने झारीने पाणी देणे शक्य होत नाही. अशावेळी पाटाने पाणी देणे सोयीचे ठरते. मात्र, पाणी देताना त्याचा प्रवाह कमी ठेवावा, तसेच वाफ्याच्या तोंडाशी गवताची पेंढी ठेवावी म्हणजे पाण्याचा जोर कमी होईल आणि बियाणे पाण्याबरोबर वाफ्याच्या कडेला वाहून जाणार नाही. बी पेरल्यानंतर जमिनीचा वरचा थर सात ते आठ दिवसापर्यंत ओला असणे आवश्यक आहे. त्यामुळे बियांची उगवण चांगली होते. त्यानंतर पाणी बेताने ७ ते ८ दिवसांच्या अंतराने द्यावे. तण असल्यास खुरपणी करावी. रोपांच्या ओळीमधील माती हलवून घ्यावी म्हणजे रोपांच्या मुळांभोवती हवा खेळती राहील. पुनर्लागवडीच्या अगोदर पाणी कमी करावे. त्यामुळे रोपे काटक बनतात. मात्र रोपे उपटण्यापूर्वी २४ तास अगोदर पाणी द्यावे त्यामुळे रोप काढणे सोपे होते. खरीप हंगामात ४० ते ५० दिवसात तर रब्बी हंगामात ५० ते ५५ दिवसात रोप तयार होते. रोप तयार होत असताना त्यावर फुलकिडे आणि शेंडा जळणे या रोगांचा प्रादुर्भाव होतो. यांच्या नियंत्रणासाठी ऑक्सिडिमेटॉन मिथाईल १५ मि.लि. आणि २५ ग्रॅम मँकोझेब प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १०ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. या द्रावणात सर्फेक्टंट मिसळावा.



## रोपवाटिकेसाठी ठिबक, तुषार सिंचन

ठिबक किंवा तुषार सिंचनावर रोपवाटिका तयार करण्यासाठी ट्रॅक्टरच्या साहाय्याने एक मीटर रुंद, ६० मीटर लांब आणि १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. त्यावर ठिबक सिंचनाच्या दोन लॅटरल ६० सें.मी. अंतरावर ओढून घ्याव्यात. लॅटरला ३० ते ४० सें.मी. अंतर ड्रीपर्स असावेत. तुषार सिंचनासाठी दोन नोझलमध्ये तीन मीटर बाय तीन मिटर अंतर ठेवावे. वाफ्यावर रुंदीशी समांतर १० सें.मी. अंतरावर रेघा पाडून त्यात बियाणे पेरावे. ठिबक किंवा तुषार सिंचनावर रोपवाटिका तयार केली तर एकरी दोन किलो बियाणे पुरते. नेहमीच्या पद्धतीमध्ये ३.५ किलो बी लागते. याशिवाय पाण्यात देखील ४० टक्के बचत होते.

## तण नियंत्रण

ठिबक किंवा तुषार सिंचनावर रोपवाटिका तयार करण्यासाठी ट्रॅक्टरच्या साहाय्याने एक मीटर रुंद, ६० मीटर लांब आणि १५ सें. मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. त्यावर ठिबक सिंचनाच्या दोन लॅटरल ६० सें.मी. अंतरावर ओढून घ्याव्यात. लॅटरला ३० ते ४० सें.मी. अंतर ड्रीपर्स असावेत. तुषार सिंचनासाठी दोन नोझलमध्ये तीन मीटर बाय तीन मिटर अंतर ठेवावे. वाफ्यावर रुंदीशी समांतर १० सें.मी. अंतरावर रेघा पाडून त्यात बियाणे पेरावे. ठिबक किंवा तुषार सिंचनावर रोपवाटिका तयार केली तर एकरी दोन किलो बियाणे पुरते. नेहमीच्या पद्धतीमध्ये ३.५ किलो बी लागते. याशिवाय पाण्यात देखील ४० टक्के बचत होते. रोपवाटिकेतील तणांच्या नियंत्रणासाठी बियाणे पेरणीनंतर वाफ्यावर पेंडिमिथॅलीन दोन मि.लि.प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तणनाशक फवारणीनंतर लगेच पाणी द्यावे.

## पूर्व मशागत आणि रान बांधणी

मध्यम भारी जमीन असल्यास लोखंडी नांगराने १५ ते २० सें.मी. खोल नांगरणी करावी, नंतर दोन-तीन कुळवाच्या पाळ्या देऊन मोठी ढेकळे फोडून जमीन भुसभुशीत करावी. हेक्टरी २५ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत कुळवणीद्वारे जमिनीत मिसळावे. खरीप हंगामात गादीवाफ्यावर लागवड करावी. मध्यम भारी आणि भुसभुशीत किंवा नदीकाठच्या पोयट्याच्या जमिनीत रब्बी हंगामात सपाट वाफे पद्धतीने कांद्याची लागवड करावी, कारण अशा वाफ्यातून सरी-वरंबा पद्धतीपेक्षा ३० टक्के रोपे जास्त लागतात आणि मध्यम व सारख्या आकाराचे कांदे मिळू शकतात. वाफ्याची लांबी-रुंदी जमिनीच्या उतारावर अवलंबून असते. १.५ ते २ मीटर रुंद आणि ४ ते ६ मीटर लांबीचे सपाट वाफे तयार करावेत. वाफ्याची लांबी जमिनीच्या उताराच्या आडव्या दिशेने असावी. जमीन जास्त चढ-उताराची असल्यास १.५ बाय ३ मीटर आकाराचे लहान वाफे तयार करावेत.

## ठिबक, तुषार रानबांधणी

ठिबक व तुषार सिंचन या पद्धतीने पाणी देण्यासाठी रान बांधणी वेगळ्या प्रकारे करावी लागते. १२० सें. मी. रुंद, ४० ते ६० मीटर लांब आणि १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे ट्रॅक्टरला जोडता येणाऱ्या सरी यंत्राने तयार करावेत. सरीयंत्राचे फाळाची दोन टोके १६५ सें.मी.



अंतरावर कायम करून ट्रॅक्टर चालवला तर १२० सें.मी. रुंदीचा गादी वाफा तयार होतो. वाफ्याच्या दोन्ही कडेला ४५ सें.मी. रुंदीच्या दोन सऱ्या तयार होतात. या जागेचा उपयोग फवारणी करणे, गवत काढणे, पिकांचे निरीक्षण करण्यासाठी होतो.

- प्रक्रिया उद्योगासाठी जाती : पांढऱ्या कांद्यापासून वाळवलेले काप, पावडर तयार करतात. लहान आकाराचे पांढरे लोण कांदे (२० ते २५ मि.मी. व्यास) व्हिनेगार व मिठाच्या पाण्यात प्रक्रिया करून निर्यात करतात. प्रक्रियासाठी गोलाकार, पांढरा रंग, विद्राव्य घनपदार्थ १५ ते १७ टक्क्यांपेक्षा जास्त, साठवणुकीत काळी बुरशी रोगाचा प्रादुर्भाव कमी असणारी, कमीत कमी २ ते ३ महिने चांगली साठवण असणारी जात निवडावी. सध्या भारतात उपलब्ध असलेल्या पांढऱ्या जाती प्रक्रियेसाठी वापरता येतात. १५ टक्क्यांपेक्षा जास्त विद्राव्य पदार्थ असणाऱ्या कमी प्रकाश कालावधीत तयार होणाऱ्या जातींचे संशोधन राष्ट्रीय कांदा व लसूण संशोधन संचालनालयामध्ये सुरू आहे. लोणचे निर्मिती पांढरा कांद्याची जात निवडावी. निर्यात तसेच लोणचे निर्मितीसाठी लाल रंगाची ॲग्रिफाउंड रोज आणि अर्का बिंदू ही जात निवडावी.
- तणनाशकाचा वापर : रोपे लागवडीपूर्वी कोरड्या वाफ्यात १५ मि.ली. ऑक्सिफ्लोरफेन किंवा पेंडीमिथॅलीन ३० मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तणनाशक फवारणीसाठी विशिष्ट प्रकारच्या नोझलाचा वापर करावा. फवारणीनंतर लगेच पाणी देऊन लागवड करावी. लागवडीनंतरसुद्धा २ ते ३ दिवसांत ओल्या वाफ्यात किंवा लागवडीनंतर ८ ते १० दिवसापर्यंत तणनाशकाची फवारणी करता येते.
- पाणी नियोजन : पाण्याचे प्रमाण आणि दोन पाळींतील अंतर हे पिकाची वाढीची अवस्था, लागवडीचा हंगाम, जमिनीचा मगदूर इत्यादी वर अवलंबून असते. पिकाला पाणी देताना १५ सें.मी. जास्त खोलवर ओल जाईल असे पाणी देण्याची गरज नाही. सुरवातीच्या काळात पिकाला बेताचे पाणी लागते. कोरड्यात लागवड केल्यास पाठोपाठ पाणी द्यावे. कोरडी किंवा ओली लागवड केल्यानंतर दोन दिवसांनी चिंबवणी द्यावी. खरीप कांद्यास क्वचितच पाणी देण्याची गरज पडते. दोन पावसाच्या पाळ्यात अंतर पडले तर ठिबक किंवा तुषार सिंचनाद्वारे एक-दोन वेळा पाणी द्यावे. काढणीपूर्वी दोन आठवडे अगोदर पाणी बंद करावे. त्यामुळे कांदा पोसतो, सड कमी होते, माना जाड होत नाहीत. रब्बी कांद्याला ऑक्टोबर ते जानेवारीमध्ये ८ ते १२ दिवसांनी आणि फेब्रुवारी ते एप्रिलमध्ये ५ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.
- काढणी : रांगडा किंवा रब्बी हंगामात पिकाची वाढ पूर्ण होऊन, पाने पिवळी पडून माना पडू लागल्याबरोबर काढण्यापूर्वी १५ ते २० दिवस आधी पाणी देणे बंद करावे. त्यामुळे कांदा पक्व होण्यास मदत मिळते. कांदे घट्ट होतात, वरचा पापुद्रा सुकू कांद्याला काढणीच्या वेळेस इजा



होत नाही. साठवणुकीचा विचार करता योग्य जाती निवडाव्यात. चांगली सुकवणी करून शिफारस केलेल्या चाळीत कांदा साठवावा.
- पिकाची अतिरिक्त वाढ रोखणे : कसदार जमीन व खतांच्या अधिक मात्रा यामुळे कांद्याची पात वाढते, मान जाड होतात. कांदा पोसण्यास सुरवात ८० ते ९० दिवसांनंतर होते. त्यामुळे काढणी लांबते, कांदे लांबुळके निघतात. उशिरा लागवड झाली असेल तरीदेखील पानांची वाढ मर्यादेपेक्षा जास्त होते. पानांची अतिरिक्त वाढ रोखण्यासाठी पीक ७५ ते ९० दिवसांचे असताना क्लोरमेक्वाट क्लोराईड हे वाढ नियंत्रक एक लिटर पाण्यात ४ ते ६ मि.लि. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

## खत व्यवस्थापन

प्रतिहेक्टरी १५ टन चांगले कुजलेले शेणखत उन्हाळ्यात पसरून नांगरट करून मातीमध्ये मिसळावे. शेणखत, हिरवळीचे खत आणि इतर पिकांची फेरपालट व्यवस्थित असेल तर सूक्ष्मद्रव्ये उपलब्ध होतात. शेणखत मिसळण्यापूर्वी वीस दिवस आधी त्यामध्ये प्रतिहेक्टरी पाच किलो ट्रायकोडर्मा मिसळून खताच्या ढिगाला हलके ओले करून झाकून ठेवावे. त्यामुळे ट्रायकोडर्माची वाढ होते. पिकासाठी खतांची मात्रा किती द्यायची हे जमिनीचा प्रकार, लागवडीचे हंगाम, वापरली जाणारी आणि खत देण्याच्या पद्धती यावर अवलंबून असते.माती परीक्षणानुसार खतमात्रा द्यावी. प्रतिहेक्टरी ११० किलो नत्र, ४० किलो स्फुरद, ६० किलो पालाश व ५० किलो गंधकयुक्त खते द्यावीत. यापैकी १/३ भाग नत्र, संपूर्ण स्फुरद, पालाश व गंधक लागवडीच्या वेळी आणि राहिलेले नत्र दोन हप्त्यात विभागून द्यावे. नत्राचा पहिला हप्ता लागवडीनंतर ३० दिवसांनी आणि दुसरा त्यानंतर १५ ते २० दिवसाने द्यावा. शिफारस केलेल्या मात्रेपेक्षा नत्र खत जास्त आणि लागवडीच्या ६० दिवसानंतरसुद्धा दिल्यास कांद्याची पात जास्त वाढते, माना जाड होऊ लागतात. कांदा आकारामध्ये लहान रहातो, जोड कांद्याचे प्रमाण जास्त होते. साठवण क्षमता कमी होते. स्फुरद जमिनीत ३ ते ४ इंच खोलीवर रोपांच्या लागवडीअगोदर द्यावे. म्हणजे नवीन मूळ तयार होईपर्यंत स्फुरद उपलब्ध होते. स्फुरदाच्याबरोबरीने पालाशची पूर्ण मात्रा लागवडी अगोदर द्यावी. कांद्यामध्ये गंधकाचे प्रमाण जास्त असते आणि म्हणून कांद्यासाठी गंधकयुक्त खतांची गरज भासते. पिकास सिंगल सुपर फास्फेट, म्युरेट ऑफ पोटॅश आणि अमोनियम सल्फेट खत दिले तर गंधक वेगळा वापरण्याची गरज नाही. जस्त, लोह व मॅगनीज या सूक्ष्म अन्नद्रव्यांची गरजेनुसार फवारणीदेखील फायदेशीर ठरते. खत पेरून गादी वाफे तयार करावेत. राहिलेले नत्र तीन-चार हप्त्यांत द्यावे. ठिबक सिंचन असेल तर खताच्या टाकीतून युरिया द्यावा. तुषार सिंचन असेल तर वाफ्यावर युरिया फोकून द्यावा. त्यानंतर संच चालवावा. ठिबक सिंचनातून विद्राव्य खते देता येतात. खतांच्या मात्रा कमी प्रमाणात अधिक भागात विभागून दिल्यामुळे खतांची कार्यक्षमता वाढते. उत्पादनात २० ते ३० टक्के वाढ होते. पाण्याची ३० ते ४० टक्के बचत होते. एकसारख्या उत्पादनाची प्रतवारी मिळते. विक्रीलायक कांद्याचे प्रमाण जास्त मिळते. रोपांचे नागे पडण्याचे प्रमाण कमी होते. जमिनीत सतत वापसा रहात असल्याने जमीन भुसभुशीत राहून काढणी सोपी होते. फॉस्फरस , पोटॅश आणि गंधक लागवडीआधी जमिनीत वाफे तयार करताना द्यावे. मात्र, नत्र देताना ते पाच ते आठ वेळा विभागून लागवडीच्या ६० दिवसांपर्यंत ठिबकमधून द्यावे.

## जातींची निवड

- खरीप हंगाम : खरीप कांदा ऑक्टोबर ते नोव्हेंबर या महिन्यात बाजारपेठेत आणता आला तर चांगला दर मिळतो. त्यासाठी बियाणे पेरणी एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात किंवा मे महिन्यात करून रोपांची लागवड जून-जुलैच्या पहिल्या आठवड्यात करावी. जूनच्या पहिल्या आठवड्यात लागवड झाली तर सप्टेंबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात कांदा काढणीला येतो. या काळात पाऊस नसेल तर काढणी व तात्पुरती सुकवणी चांगली होऊ शकते. भीमा सुपर, भीमा राज, भीमा रेड, तसेच पांढऱ्या जातीमध्ये भीमा शुभ्रा, भीमा श्वेता तसेच अन्य कृषी विद्यापीठ, फलोद्यान संशोधन संस्थांनी विकसित केलेल्या बसवंत ७८०, फुले समर्थ किंवा ॲग्रिफाउंड डार्क रेड, अर्का कल्याण जातींची निवड करावी.
- रांगडा हंगाम : ऑगस्ट-सप्टेंबर बी पेरून रोपांची पुर्नलागवड ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात करावी. काढणी जानेवारी-फेब्रुवारी या महिन्यात होते. ज्या शेतकऱ्यांना खरीपात पाण्याअभावी लागवड करता येत नाही आणि ज्याच्या विहिरीतील पाणी जेमतेम फेब्रुवारी-मार्च पर्यंतच पुरते, त्यामुळे रब्बी कांदा करता येत नसल्याने रांगडा कांद्याची लागवड करावी. रब्बी हंगामातील किंवा खरिपातील जातींचे स्वतः घरी अशास्त्रीय पद्धतीने तयार केलेले बी वापरून रांगडा हंगामात लागवड केली तर डेंगळे वाढण्याची शक्यता जास्त असते. बसवंत ७८०, एन २-४-१, ॲग्रिफाउंड लाइट रेड, फुले समर्थ,भीमा सुपर,भीमा रेड, भीमा शक्ती, भीमा शुभ्रा या जातींची लागवड करावी. एन २-४-१, ॲग्रिफाउंड लाइट रेड या जातीमध्ये रांगडा हंगामात वातावरणानुसार डेंगळे येण्याचे प्रमाण असू शकते.
- रब्बी हंगाम : रब्बी हंगामातील हवामानामुळे कांद्याची प्रत चांगली असते. उत्पादन अधिक मिळते. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात बियाणे पेरून रोपांची लागवड डिसेंबर किंवा जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात करावी. नोव्हेंबर महिन्यात शेवटी लागवड केली तर एप्रिलमध्ये काढणी होते. पाती आणि कांद्याची सुकवण चांगली होते. सुकवलेला कांदा साठवणीत चांगला टिकतो. लागवडीस शिफारशीत कालावधीपेक्षा उशिरा झाला तर उत्पादनात घट येते.

## जाती

- लाल कांदा : भीमा किरण, भीमा शक्ती, एन२-४-१, अर्का निकेतन, ॲग्रीफाउंड लाइट रेड.
- पिवळा कांदा : फुले सुवर्णा, अर्का पीतांबर या जाती चांगल्या आहेत. भारतीय बाजारपेठेत पिवळ्या रंगाच्या जातींची मागणी कमी आहे, परंतु युरोपीय बाजारपेठेसाठी या जाती उपयुक्त आहेत. पिवळा रंगाची अर्ली ग्रानो ही जात मैदानी भागात रब्बी हंगामासाठी उपयुक्त आहे.
- पांढरा कांदा : भीमा श्वेता, फुले सफेद, ॲग्रीफाउंड व्हाइट
- पांढरा कांद्याची लागवड अकोला, नागपूर, अमरावती, जळगाव व धुळे जिल्ह्यात होते.
- मल्टिप्लायर जाती : सी.ओ.१, सी.ओ. २, सी.ओ. ३, सी.ओ. ४, ॲग्रीफाउंड रेड, ए.डी.यू. १ या मल्टिप्लायर जाती आहेत. मल्टिप्लायर जातीमध्ये एका रोपात ८ ते १० मध्यम ते लहान आकाराचे कांदे मिळतात. या जातींची लागवड दक्षिण भारतात केली जाते.



## पुनर्लागवड

सपाट वाफे किंवा सरी-वरंबे पद्धतीमध्ये पाणी देऊन रोपांची लागवड केली जाते. काही ठिकाणी कोरडी लागवड करतात. परंतु या पद्धतीत रोपांची लागवड केल्याबरोबर पाठोपाठ वाफ्यातून पाणी द्यावे. पाणी देताना रोप वाहू नये म्हणून वाफ्याच्या तोंडावर गवताची पेंडी लावून पाण्यावर नियंत्रण ठेवावे. ओली लागवड करताना पुरेसे पाणी राहील याची काळजी घ्यावी, तसेच रोपांची संख्या ठराविक असावी. खरीप हंगामात १० सें.मी. बाय १५ सें.मी. अंतरावर पुनर्लागवड करावी. रब्बी हंगामात १० सें.मी. बाय १० सें.मी. किंवा १० सें. मी. बाय १५ सें.मी. अंतरावर पुनर्लागवड करावी. रोपे लागवड करताना ती अंगठ्याने दाबू नयेत, यामुळे माना वाकड्या होऊन वाढीस वेळ लागतो. ठिबक किंवा तुषार सिंचनावर लागवड करताना संच रोप लागवडीअगोदर सुरू करावा. सरासरी चार सें.मी. खोलीपर्यंत ओल राहील इतपत पाणी द्यावे. दुसऱ्या दिवशी वाफ्यावर लागवड करून त्यानंतर पाणी द्यावे. कार्बेन्डाझिम एक ग्रॅम किंवा क्लोरोथॅलोनील दोन ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. या द्रावणात पुनर्लागवडीपूर्वी रोपांची मुळे १५ मिनिटे बुडवावीत. ज्या भागात फुलकिडींचा प्रादुर्भाव जास्त आहे तेथे दीड मि.ली. कार्बोसल्फान (२५ ई.सी.) प्रति लिटर पाण्यात मिसळून या द्रावणात रोपांची मुळे दोन तास बुडवून ठेवावीत. यामुळे लागवडीनंतर २० ते २५ दिवस किडींपासून संरक्षण होते.

## शॉर्ट न्यूज

### बसची दुचाकीला धडक दोनजण जखमी

**श्रीरामपुर :** बसने दुचाकीस धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील दोघे जखमी झाले. जखमी तरुण श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथील आहेत. अपघातानंतर महिला चालक बस घेऊन निघून गेली. ही घटना सोमवारी (दि. २५) सकाळी घडली. बस क्रमांक एम. एच. १४, बीटी ३२२४ ही बस शिर्डीहून श्रीरामपूर मार्गे संभाजीनगरकडे जात होती. ममदापूर बसस्थानकासमोर या बसने दुचाकीला धडक दिली. दोघे तरुण लोणी येथे आयटीआय कॉलेजला जात होते. दुचाकी चालकाने हेल्मेट घातले असल्यामुळे त्याच्या डोक्यास मार लागला नाही.

### मोनिका राजळे यांना मंत्रिपद मिळू दे

**शेवगाव :** आव्हाणे बु. येथील स्वयंभू निद्रस्त गणपती देवस्थान येथे लाडक्या बहिणींनी एकत्र येऊन आ. मोनिका राजळे या विजयी झाल्याबद्दल नवसपूर्ती केली. यावेळी गणरायाला अभिषेक करुन मोनिका राजळे यांना मंत्रिपद मिळू दे, आमची मनोकामना पूर्ण होऊ दे असे साकडे गणपती बाप्पाला घातले आहे. यावेळी देवस्थानचे पुजारी वसंतदेवा भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली गणरायाला अभिषेक करुन पूजा, आरती करण्यात आली. त्यानंतर पेढे वाटप करुन आ. राजळे यांच्या विजयाचा आनंद साजरा करण्यात आला.

### संगमनेरातील वाहतूक कोंडीवर निघणार मार्ग

**संगमनेर :** शहरात वाहतूक कोंडीमुळे सगळेच वैतागले आहेत. हा प्रश्न कायमचा मार्गी लागावा म्हणून संगमनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्याम मिसाळ यांनी नुकतीच पाहणी केली असून प्रत्यक्ष कामालाही सुरूवात केली आहे. मध्यवर्ती असणाऱ्या संगमनेर बसस्थानकावरून बाहेर पडताना अकोले रस्त्याकडे जाताना रिक्षा थांबा कायमच रहदारीला मोठा अडथळा ठरत आहे. त्यामुळे सदरचा रिक्षा थांबा हा बसस्थानक परिसरात घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**श्रीगोंदा :** शहरापासून जवळच्याच अंतरावर राहणाऱ्या एका ड्रायव्हरने येथील अल्पवयीन मुलीसोबत अश्लील कृत्य केल्याचा प्रकार दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ रोजी घडला आहे. कामानिमित्त बाहेर गेलेल्या तिच्या आई-वडिलांना विचारण्यासाठी गेलेल्या त्या इसमाने नमुद अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने त्याच्यावर बाल लैंगिक अत्याचार कायदा कलम तसेच अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा व बलात्कार या कलमाने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण

**अकोले :** तालुक्यातील मवेशी येथील पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रात जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी चार महिने कालावधीचे पोलीस व सैन्यदल भरतीचे मोफत पूर्व प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले असून यासाठी ५ डिसेंबरपर्यंत ऑफलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन राजुर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे. अनुसूचित जमातीच्या मुलांना या मोफत भरतीपूर्व प्रशिक्षणात निवास व भोजन सुविधाही दिली जाणार आहे.

# निमगाव भोगीकर त्वचेच्या विकारांनी त्रस्त!

## महाराष्ट्र इनव्हायरो पॉवर लि. कंपनीचे प्रदुषण | निमगाव भोगी ग्रामस्थांवर गाव सोडण्याची वेळ

**शिरुर : सतीश डोंगरे**

**आपलच गाव व आपलीच शेती असतानाही प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे रांजणगाव एमआयडीसी मधील महाराष्ट्र इनव्हायरो पॉवर कंपनीच्या प्रदुषणाच्या फटक्याने निमगाव भोगी ग्रामस्थांचे जगणेच मुश्कील झाल्याचे चित्र आहे. गावातील अनेक ग्रामस्थांना त्वचेच्या गंभीर आजारांसह विविध व्याधींनी ग्रासले आहे. आपले घर व शेत सोडून दूर राहावयास जाण्याची वेळ येथील भूमिपुत्रांवर आली आहे.**



रांजणगांव एमआयडीसी लगत असणारे निमगाव भोगी गांव अनेक दिवसांपासून त्वचा विकारांसह विविध आजारांशी सामना करीत आहे. या विदारक अवस्थेचे कारण म्हणजे महाराष्ट्र इनव्हायरो पॉवर लि. कंपनीचे प्रदुषण. वर्षभरापासून ग्रामस्थ कंपनीच्या या जीवघेण्या प्रदुषणाविरोधात लढा देत आहेत. शासनाला पत्रव्यवहार, निवेदने, उपोषण, कंपनीच्या प्रवेशद्वारावर आंदोलन, पुणे- नगर रस्त्यावर रास्ता रोको अशा विविध मार्गांनी दाद मागूनही प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे त्यांच्याकडे लक्ष देण्यासाठी कुणाकडेच वेळ नाही. त्यामुळे ग्रामस्थांवर आता अक्षरशः गावच सोडण्याची वेळ आली आहे.

कंपनीने सोडलेल्या दूषित पाण्यामुळे शेतीमधील विहीरींचे व ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचे स्रोत खराब झाले आहेत. कंपनीने ओढ्याला सोडलेल्या रसायनयुक्त पाण्यामुळे ते पाणी पिल्याने आत्तापर्यंत अनेक जनावरे मृत पावली आहेत. प्रदुषणमुक्त पाण्यामुळे निमगाव भोगी ग्रामस्थांना किडनीचे विकार, कॅन्सरची लागण झाल्याचे यापूर्वी प्रिस्टाईन चॅरीटी या संस्थेने गावात केलेल्या आरोग्य सर्वेक्षणातून उघड झाले आहे. मात्र तरीही प्रशासन या विषयाकडे गंभीरपणे पहायला तयार नाही, असा स्थानिक ग्रामस्थांचा आरोप आहे.

अनेक नागरिकांना गंभीर आजार आणि व्याधींनी ग्रासले आहे. दूषित पाण्यामुळे संपूर्ण गावाचेच स्वास्थ्य बिघडून गेले आहे. अनेक वेळा तक्रारी करून ही कंपनीच्या वतीने कुठलीच उपाययोजना करण्यात येत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्याबरोबरच प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे ही तक्रारी करून त्यांच्याकडून ही अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.


### आमच्याच गावातून आमची घरेदारे सोडून परागंदा व्हायचे का ?

**निमगाव भोगी सह परीसरातील आठ गावांना रांजणगाव एमआयडीसी मधील महाराष्ट्र इनव्हायरो पॉवर लि. कंपनीच्या प्रदुषणचा मोठा फटका बसत आहे. गेले वर्षभरापासून आम्ही या विरोधात लढा देत आहोत परंतू निर्ढावलेल्या व्यवस्थेला आमच्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही ही शोकांतिका आहे. या कंपनीतून रोज सायंकाळी सुटणारा उग्र वास, दिवसभर फिरणारी कचरा डेपोतून आलेली भटकी कुत्री, कंपनीने सोडलेल्या पाण्यातून माणसांसह जनावरांना गंभीर व्याधींनी पछाडले आहे. शेती नापीक झाली आहे. आरोग्याच्या उद्भवलेल्या जीवघेण्या समस्यांमुळे ग्रामस्थांचे जगणेच मुश्कील झाले आहे. यातून आता आम्ही आमची घरेदारे सोडून परागंदा व्हायचे का, असा प्रश्न येथील नागरिक उपस्थित करीत आहेत.**

**उज्वला अंकुश इचके**
सरपंच, निमगाव भोगी

## वाचकांच्या लेखणीतून

# वेळेचा सदुपयोग



वक़्त एक बेजान दरिया की तरह ख़ामोश है।
क्यूं न एक पत्थर उठाकर मैं भी फेंक दूं।।

अज़ीज़ इन्दौरी म्हणतात, काळ एका अचेतन समुद्रासारखा नि:स्तब्ध आहे. अशा वेळी मीही एखाद्या दगडाचा खडा त्या समुद्रात का न फेकून पहावा?

अजिंठा, वेरूळ, घारापुरी या ठिकाणच्या कोरीव शिल्पांचा इतिहास, धर्म अशा अनेक अंगांनी अभ्यास केला जातो. तो आवश्यकही आहे.

बौध्द साधू भिक्षाटन आणि धर्मप्रसारासाठी विविध ठिकाणी भ्रमण करीत. भारतात आणि चीन, श्रीलंका अशा परदेशांतही ते धर्मप्रसारासाठी भ्रमण करीत असत.

पावसाळ्याच्या चार महिन्यांत मात्र त्यांचे भ्रमण बंद असे. ते पर्वतीय गुहांमध्ये पावसाळ्यात आसरा घेत. या काळी ते संधीचा सदुपयोग करीत. एखाद्या पर्वताच्या कठीण किंवा पक्क्या कातळात हे साधू पुराणे किंवा जातकांतील कथांना छन्नीहातोड्यांच्या सहाय्याने शिल्पाचे रूप देत असत. त्यांतून कोरलेला इतिहास कातळशिल्पांच्या माध्यमातून साकार होत असे. तो आपल्या पुरातत्त्व, शिल्प आणि इतिहास अभ्यासकांना फार उपयुक्त ठरतो. हे बौद्ध साधूंचे आपल्यावर मोठेच उपकार होत.

थोडक्यात, वेळेचा सदुपयोग कसा करावा ते या बौद्ध साधूंकडून आपण शिकले पाहिजे.

म्हणूनच कवी केशवसुतही म्हणाले,
प्राप्तकाल हा विशाल भूधर
सुंदर लेणी त्यात खोदा

आपल्याला लाभलेला काळ हा विशाल पर्वत आहे. त्यात सुंदर लेणी खोदा.

**नाना ढवळे,** ८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# कौठा येथे कृषिदुतांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

## कृषिदुतांचे गावात आगमन, शेतकऱ्यांकडून स्वागत

**कौठा : प्रतिनिधी**

**महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्न कृषी महाविद्यालय सोनईच्या चतुर्थ वर्षांतील विद्यार्थी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नेवासे तालुक्यातील कौठा गावात दाखल झाले आहेत. ग्रामीण कृषी जागरूकता व कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत दहा आठवडे चालणाऱ्या या कार्यक्रमांत विविध प्रकारच्या आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती हे कृषिदुत शेतकऱ्यांना देणार आहेत.**



कृषिदुतांचे स्वागत गावाचे सरपंच प्रमोद त्रिंबक गजभार, उपसरपंच कडूभाऊ नामदेव मोहिते व इतर कर्मचाऱ्यांनी केले. कृषी पदवी अभ्याक्रमाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थी ग्रामीण कृषी जागरूकता हा प्रात्यक्षिक कार्यक्रम राबवणार आहे. कृषिदुत योगेश म्हसे, सौरभ मोरे, चेतन साठे, अजित यादव, चैतन्य येवले हे विद्यार्थी कौठा गावात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

या दरम्यान विद्यार्थी प्रत्यक्ष गावात जाऊन प्रथम सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, शेतकऱ्याचे जीवनमान यांचा सामाजिक, अर्थिक स्तर, साक्षरतेचे प्रमाण संबंध, गावातील पीक पद्धती, नैसर्गिक संसाधने परीक्षण, पाणी व्यवस्थापन, विविध पिकावरील रोग व किडीचे व्यवस्थापन, हवामान सल्ला, बाजारभाव व आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल माहिती दिली जाणार आहे. कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत शेवटच्या चार आठवड्यांत विद्यार्थी कृषी आधारित व्यवसाय किंवा उद्योगामध्ये प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव घेतील.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. मोरे, उप प्राचार्य डॉ. एस. व्ही. बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अतुल ए. दरंदले, कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. एस. गोंधळी, प्रा. जे. एम. वाघमारे, प्रा. आर. टी. दिघे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# थोरात कारखान्यास राष्ट्रीय पातळीवरील को -जनरेशन अवॉर्ड

## अध्यक्ष बाबासाहेब ओहोळ यांची माहिती

**संगमनेर : प्रतिनिधी**

**माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील सहकारासाठी दिशादर्शक ठरलेल्या सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याला वीज निर्मितीमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रीय पातळीवरील नॅशनल को जनरेशन २०२४ हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष बाबासाहेब ओहोळ यांनी दिली.**




ऊस गाळपाबरोबर कारखान्याने वीज निर्मितीमध्ये सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे, या कामगिरीची दखल घेऊन नॅशनल को जनरेशन फेडरेशनच्या वतीने स्पेशल कॅटेगिरी मधून सातत्यपूर्ण कामगिरीचा नॅशनल को जनरेशन पुरस्कार २०२४ या कारखान्यासाठी जाहीर झाला आहे. यापूर्वीही या पुरस्काराने थोरात कारखान्याचा दिल्ली येथे सन्मान झाला आहे.

(पान १ वरुन)

### मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांची वर्णी

लावले जात आहेत. विविध पक्षाचे वेगवेगळे नेते या बाबत दावे करत आहेत. मात्र, भारतीय जनता पक्षाच्या वतीने देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्का मोर्तब झाले असल्याची माहिती एका ज्येष्ठ भाजपच्या नेत्याने दिली आहे. देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी हा ५ डिसेंबर रोजी आझाद मैदानावर होणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली. त्यामुळे राज्यात सुरू असलेल्या चर्चेला आता पूर्णविराम लागला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला भाजप तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून देखील हिरवा कंदिल मिळाला आहे. त्यांच्याच नेतृत्वात भाजपने निवडणूक लढली असून त्यामुळे त्यांनाच मुख्यमंत्री करण्याचा निर्णय झाला असल्याची माहिती देखील सूत्रांनी दिली आहे.

### माझ्या कुटुंबातील चार मतं कुठे गेली?

अधिकार नाही. फक्त दोन नंबर किंवा तीन नंबर वर राहिलेल्या उमेदवारांना याचा अधिकार आहे. त्यानंतर मी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे संदीप वर्पे यांच्याशी संपर्क करून त्यांना फेर मतमोजणीसाठी मागणी करावी अशी विनंती केल्यानंतर त्यांनी फेर मतमोजणीची मागणीसाठी अर्ज दाखल केला असल्याचे चंद्रहंस औताडे यांनी म्हटले आहे.

**बॅलेट पेपरवर मतदान घ्यावे**

माझ्या कुटुंबातील सर्वांनी मलाच मतदान केलेला आहे. परंतु कमी मतं दाखवण्यात येत असल्याने मला या प्रक्रियेवर किंवा ईव्हीएम मशीनवर विश्वास राहिलेला नाही. त्यामूळे भविष्यातील सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घ्यावे अशी माझी निवडणूक आयोगाकडे मागणी असल्याचे चंद्रहंस औताडे यांनी म्हटले आहे.

### मॅच फिक्सिंगमुळे दक्षिण आफ्रिकेची लाज गेली!

गेला होता २०१६ मध्ये एका व्हिसलब्लोअरने स्पर्धेत मॅच फिक्सिंग केल्याचे उघड झाल्यानंतर ही चौकशी सुरू झाली. नोव्हेंबर रोजी अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले होते. जिथे त्याची सुनावणी २० फेब्रुवारी २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात आली. सोलेकिले यांना २८ तारखेला तर सोत्सोबेला २९ नोव्हेंबरला अटक करण्यात आली होती. या सर्वांविरुद्ध बराच काळ चौकशी सुरू होती.

अटक केलेल्या खेळाडूंमधील सोलेकिलेने याने ३ कसोटी सामने खेळले होते. मात्र त्याला खास काही कामगिरी करता आलेली नव्हती. तर एथी मबालाती याने आफ्रिकेकडून आंतरराष्ट्रीय पातळीवर पदार्पण करण्याची संधी मिळाली नाही. मात्र देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने १२९ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत. यामधील लोनवाबो त्सोत्सोबे याने आफ्रिकेकडून तिन्ही फॉरमॅटमध्ये क्रिकेट खेळले आहे. ६१ वन डे सामन्यांमध्ये ९४ विकेट तर ५ कसोटीमध्ये ९ विकेट आमि २३ टी-२० सामन्यांमध्ये १८ विकेट आपल्या नावावर केल्या आहेत. मात्र २०१५ नंतर एकही सामना खेळलेला नाही.

दरम्यान, लोनवाबो त्सोत्सोबे हा जागतिक दर्जाचा वेगवान गोलंदाज राहिला आहे. आपल्या करियरमध्ये त्याने वन डे फॉरमॅटमध्ये रोहित शर्मा, विराट कोहली आणि एम. एस. धोनीसारख्या दिग्गज फलंदाजांना आऊट केले आहे. मात्र आता मॅच फिक्सिंग प्रकरणामुळे करियला डाग लावून घेतलाय.

# मेकॅनाइज्ड इन्फंट्रीच्या चार तुकड्यांना राष्ट्रपतींचा ध्वज प्रदान

## देशसेवेतील योगदानाचा सन्मान



**नगर : प्रतिनिधी**

**भारतीय सैन्यप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी अहिल्यानगरच्या मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर आणि स्कूल अहिल्यानगर येथे झालेल्या एका समारंभात मेकॅनाइज्ड इन्फंट्रीच्या चार तुकड्यांना प्रतिष्ठित राष्ट्रपतींचा ध्वज प्रदान केला.**

हा समारंभ त्या तरुण सैनिकांनी देशसेवेसाठी केलेल्या उल्लेखनीय व आदर्श योगदानाचा सन्मान होता. राष्ट्रपतींचा ध्वज २६ व २७ मेकॅनाइज्ड इन्फंट्री रेजिमेंटच्या तुकड्यांना तसेच २० व २२ ब्रिगेड ऑफ द गार्ड्सच्या तुकड्यांना प्रदान करण्यात आला. ज्यामुळे सैन्याच्या या तरुण तुकड्यांसाठी हा अभिमानाचा क्षण ठरला.

सैन्यप्रमुखांनी ध्वज प्रदान परेडचे निरीक्षण केले आणि चार मेकॅनाइज्ड इन्फंट्री तुकड्यांच्या चाल व इन्फंट्री कॉम्बॅट व्हेईकलवर आधारित तुकड्यांनी दाखवलेल्या अचूक मानकांचे कौतुक केले. भारताचे राष्ट्रपती यांच्यातर्फे त्यांनी या तुकड्यांना राष्ट्रपतींचा ध्वज प्रदान करून त्यांच्या देशसेवेतील योगदानाचा सन्मान केला. भारतीय सैन्याच्या या तरुण व बहुपयोगी शाखेने पायदळ व यांत्रिक सैन्याचे सर्वोत्तम तत्त्व आत्मसात केले आहे. त्यांच्या तुकड्यांनी आपल्या शौर्य व कौशल्यामुळे सर्व लढाऊ क्षेत्रांमध्ये आणि संयुक्त राष्ट्र शांतता राखीव मोहिमांमध्ये योगदान दिले आहे.

# लंके यांच्या मेळाव्याला भावनिक किनार

## धक्कादायक पराभवाचे होणार चिंतन




पारनेर : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीत दणदणीत विजय संपादन केल्यानंतर पाच महिन्याच्या अंतराने झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत खा. नीलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके यांचा धक्कादायक पराभव झाल्याने रविवारी होणाऱ्या लंके समर्थकांच्या मेळाव्यास भावनिक किनार आहे. या मेळाव्यात राणी लंके यांच्या पराभवाचे चिंतन होणार असून पुढील राजकीय वाटचालीची दिशाही ठरविली जाणार आहे.**

लोकसभा निवडणूक लढविण्यापूव खा. लंके यांनी सुप्यातील ग्रीन हेवन कार्यालयात मेळावा घेत आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला होता. त्यावेळीही कार्यकर्ते भावनिक झाले. आनेकांनी आश्रूही ढाळले. अगदी खा. लंके यांनाही त्यांच्या भावना आवरता आल्या नाहीत. मात्र पुढील लोकसभेचे आव्हान डोळयापुढे ठेवत खा. लंके यांनी आपल्या शिलेदारांना धीर देत ही लढाई आपल्याला जिंकायचीच असल्याचे सांगत रणशिंग फुंकले होते.

लोकसभा निवडणूकीच्या रणधुमाळीदरम्यान खा. लंके यांच्या शिलेदारांनी पारनेर तालुका वगळता इतर सर्व तालुक्यांमध्ये नियोजनाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. त्याचाच परिपाक बलाढ्य डॉ. सुजय विखे यांचा पराभव होण्यात झाला. लंके समर्थक इतर तालुक्यात असताना पारनेर तालुक्यातील नियोजनासाठी समर्थकांना वेळ देता आला नाही. तरीही खा. लंके यांनी मतदारसंघात मताधिक्य घेत आपली मतदारसंघावर पकड असल्याचे दाखवून दिले होते.

लोकसभा निवडणूकीत मिळालेल्या विजयामुळे खा. लंके यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांचा आत्मविश्वास दुणावला होता. तरीही कोणताही धोका न पत्करता खा. लंके यांनी विधानसभा निवडणूकीचे काटेकोरपणे नियोजन केले होते. या निवडणूकीत मोठा विजय संपादन करू असा आत्मविश्वास त्यांना होता. त्यामुळेच राणी लंके यांचा अर्ज दाखल करताना त्यांनी महिलांचे मोठे शक्तिप्रदर्शन केल्यानंतर प्रचारादरम्यान एकही सभा घेतली नाही. राज्याच्या विविध भागात महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचार सभा घेण्यातच लंके हे व्यस्त होते.

लंके यांच्या सहकाऱ्यांनी प्रत्येक बुथवर मोठया चुरशीने मतदान घडवून आणले. प्रत्येक बुथवर लंके समर्थकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. प्रत्यक्ष मतमोजणी सुरू झाली आणि मतमोजणीस असलेल्या लंके समर्थकांच्या काळजाचा ठोका चुकू लागला. चार दोन फेऱ्यांनंतर राणी लंके या आघाडी घेतील अशी त्यांना आशा होती. मात्र मताधिक्य कमी अधिक होण्यापलीकडे काहीच वेगळे घडले नाही.

### खा. लंके यांच्या भाषणाकडे लक्ष

**या मेळाव्यात खा. लंके हे काय भाषण करणार याची मतदारसंघासह जिल्हयातील नागरीकांना कमालीची उत्सुकता आहे. विधानसभा निवडणूकीत पराभव झाला असला तरी खासदारकी हातात असल्याने लंके यांच्याकडे संवैधानिक पद आले. ते कार्यकर्त्यांना काय सल्ला देणार याकडे पारनेरकरांचे लक्ष लागले आहे.**

राणी लंके यांच्या प्रचारासाठी मोठे कष्ट घेउनही अनेक हक्काच्या गावांमध्ये मताधिक्य मिळाले नाही. अनेक गावांमध्ये अनपेक्षीतपणे पिछाडी मिळाली. त्याचे विश्लेशन आजही लंके समर्थक करत आहेत. अनेकांनी ईव्हिएम वर संशय व्यक्त केला असून त्याच संशयातून राणी लंके यांच्या वतीने मतदारसंघातील १८ बुथवरील ईव्हिएमची पडताळणी करण्याची मागणी केली आहे. सन २०१९ मध्ये अशाच ईर्षेने खा. लंके समर्थकांनी विधानसभेच्या निवडणूकीत प्रचाराची यंत्रणा राबविली. प्रचारादरम्यान आपण किमान पन्नास हजार मतांनी विजयी होऊ असा ठाम विश्वास खा. लंके हे व्यक्त करत होते.

मतमोजणीनंतर लंके हे तब्बल ५९ हजार मतांनी विजयी झाले आणि नीलेश लंके यांचा आत्मविश्वास सार्थ ठरला. त्यानंतरच्या साडेचार वर्षाच्या कालखंडात लंके यांनी विकास कामांचा डोंगर उभा केला. अनेकांच्या वयक्तिक सुख, दुःखात सहभागी होत त्यांनी आधार देण्याचे काम केले. नागरीकांच्या वैयक्तिक कामांनाही लंके यांनी हातभार लावला. असे आशादायी काम असताना राणी लंके यांना धक्कादायक पराभवाला सामोरे जावे लागल्याने लंके समर्थकांमध्ये कमालीची नाराजी असून त्यामुळेच रविवारी होणाऱ्या मेळाव्याला भावनिक किनार आहे.

# गॅसच्या टँकरने वृध्दाला चिरडले

## पिंपरीजलसेनच्या शेतकऱ्याचा दुर्देवी मृत्यू



पिंपरी जलसेन : प्रतिनिधी

**पुण्याहून नगरच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या गॅस टँकर चालकाचा ताबा सुटून रस्त्यावर पलटी झाल्याने रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या मारूती रामभाऊ कदम (वय ६५) हे त्याखाली चिरडले गेले. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. गुरूवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास नगर पुणे महामार्गावरील चास शिवारात ही घटना घडली.**

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार पिंपरी जलसेन येथील शेतकरी मारूती रामभाऊ कदम व संदीप बाबाजी अडसरे हे दोघे शेतकरी पिंपरी जलसेन येथून कांदा लागवडीसाठी कांद्याची रोपे पाहण्यासाठी चास येथे गेले होते. चास शिवारात नगर पुणे महामार्गालगत उभे राहून ते दोघे कांद्याचे रोप पाहत असताना पुण्याहून नगरकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या गॅस टँकरच्या चालकाचा टँकरवरील ताबा सुटून टँकर (क्र. एम. एच. २१ बी.ए.४५७७ रस्त्यावर पलटी झाला. टँकर पलटी होउन घसरत जात रस्त्यालगत उभ्या असलेल्या मारूती कदम यांना टँकरने चिरडले तर संदीप अडसरे हे खड्डयात पडल्याने ते जखमी झाले. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर महामार्ग वाहतूक शाखेच्या पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत जखमी मारूती कदम यांना नगरच्या शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाख केले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले.

यासंदर्भात नगर तालुका पोलीस ठाण्यात टँकर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून नगर तालुका पोलीस पुढील तपास करीत आहेत. अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या मारूती कदम यांच्यावर गुरूवारी रात्री उशिरा पिंपरी जलसेन येथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीसाठी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. मारूती कदम हे विठ्ठल कदम यांचे वडील तर पत्रकार चंद्रकांत कदम यांचे चुलते होत.

# देवीभोयरे परिसरात बिबट्यांचा बंदोबस्त करा

## सरपंच अशोकराव मुळे यांची मागणी



देवीभोयरे : प्रतिनिधी

**देवीभोयरे परिसरात गेली अनेक दिवसापासून बिबट्यांचा धुमाकूळ चालू आहे. सध्याच्या परिस्थितीत ३ ते ४ बिबटे देवीभोयरे परिसरात वावरत आहे त्यामुळे परिसरात नागरिकांमध्ये प्रचंड घबराटीचे वातावरण तयार झाले आहे तीच परिस्थिती लक्षात घेता देवीभोयरे परिसरात बिबटयाचा बंदोबस्त करण्याची मागणी सरपंच अशोकराव मुळे यांनी केली.**

गेल्या २ दिवसांत संतोष काशिनाथ मुळे यांच्या २० मेंढया, भाऊ थोरात यांच्या ५ शेळ्या तर मागील महिन्यात बशीर पठाण यांच्या ५ शेळ्या, दत्ता गाजरे यांची १ शेळी या बिबटयाच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडल्या.जवळ जवळ ३ ते ४ लाख रुपये नुकसान झाल्याचे सर्व शेतकऱ्यांनी सांगितले. या सर्व नुकसानीला सर्वस्वी वनविभाग जबाबदार असल्याचे सर्व ग्रामस्थांनी सांगितले. वारंवार संपर्क करूनही वनविभागाकडून कुठल्याही प्रकारे दखल घेतली जात नसल्याची खंत सरपंच अशोकराव मुळे यांनी व्यक्त केली.

यापुढील काळात बिबट्याचा मनुष्य वस्तीत वावर जास्त होत आहे. चुकून मुक्या प्राण्यांप्रमाणे हे बिबटे मनुष्यावर देखील हल्ले करू शकतात. तर यागोष्टीला पूर्णपणे वनविभाग तसेच वनविभागाचे कर्मचारीच असतील अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली. यासर्व गोष्टी लक्षात घेऊन वनविभागाने तातडीने ३ ते ४ पिंजरे लावून बिबट्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सरपंच अशोकराव मुळे यांनी दिला.

# निराधार विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत वाढदिवस साजरा

## पै.सुनिल म्हस्के यांनी जपली सामाजिक बांधिलकी

अळकुटी : प्रतिनिधी

**सध्याच्या पिढीत वाढदिवस म्हटला की बॅनरबाजी, केक, पार्टी, डी. जे. अन् फटाक्यांची आतिषबाजी अशा सेलीब्रेशनमध्ये हजारो रुपयांची उधळण. परंतू या अनर्थ मौजमस्तीला फाटा देत म्हस्केवाडी येथील टायगर ग्रुप पारनेरचे अध्यक्ष पै. सुनिल म्हस्के यांनी आपला वाढदिवस माईनगरी येथील आश्रमातील निराधार विद्यार्थ्यांना खाऊ व किराणा वाटप करून साजरा करत नव्या पिढीसमोर आदर्श ठेवला आहे.**




श्री मनशांती छात्रालायातील निराधार विद्यार्थ्यांना किराणा व खाऊ वाटप करताना पै. सुनिल म्हस्के व मित्र परिवार

टायगर ग्रुपचे राष्ट्रीय अध्यक्ष पै. तानाजी भाऊ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पै. सुनिल म्हस्के व मित्र परिवार नेहमीच विविध समाजोपयोगी उपक्रम राबवित असून आपल्या वाढदिवसा निमित्ताने त्यांनी माईनगरी शिरूर येथील पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ संस्थापित द मदर ग्लोबल फाऊंडेशन संचलित श्री मनशांती छात्रालयाच्या निराधार विद्यार्थ्यांना किराणा व खाऊचे वाटप केले. आपल्या परिवारासोबत निराधार विद्यार्थ्यांशी हितगुज करीत वाढदिवस साजरा केला.

यावेळी रश्मी म्हस्के, साईशा म्हस्के, सचिन मोरे, श्रद्धा मोरे, कौशिक चौगुले, ओंकार हिंगमिरे, प्रथमेश रेडे, आदेश बरकडे, अनिकेत गुळवे तसेच श्री मनशांती छात्रालयाचे पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

या उपक्रमाचे द मदर ग्लोबल फाऊंडेशनचे अध्यक्ष विनय सिंधुताई सपकाळ , पारनेर तालुका पत्रकार संघाचे प्रवक्ते मंगेश पारखे तसेच म्हस्केवाडी व परिसरातील ग्रामस्थांनी कौतुक केले आहे.

# सेवाभाव टिकून ठेवण्यासाठी दातृत्वाची गरज

## ह.भ.प. रंजनाताई वराळ यांचे प्रतिपादन

निघोज : प्रतिनिधी

**सेवाभाव टिकून ठेवण्यासाठी दातृत्वाची गरज असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. रंजनाताई बाळासाहेब वराळ यांनी व्यक्त केले आहे.**




ह. भ.प. रंजनाताई वराळ यांनी प्रसादालयाला देणगी दिल्याबद्दल वसंत कवाद यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या प्रसादलयासाठी वराळ यांनी पाच हजार पाचशे पंचावन्न रूपये देणगी दिली यावेळी त्यांचा तसेच बाळासाहेब किसनराव वराळ पाटील यांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद, विश्वस्त शंकरराव लामखडे, संतोषशेठ रसाळ व बबनराव ससाणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी वराळ बोलत होत्या.

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने प्रसादालय माध्यमातून एक सेवाभावी उपक्रम सुरू केला असून अन्नदान करणे किंवा प्रसादालयासाठी मदत करणे हा सर्वाधिक मोठा सेवाभाव असून सर्वसामान्य जनतेला या माध्यमातून अन्नदानाचा लाभ मिळत असून ज्याला ईश्वराने भरभरून दिले आहे त्यांनी अन्नदानाचे पुण्यकर्म करण्याची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

ह.भ.प.रंजनाताई वराळ या किर्तन, प्रवचन माध्यमातून तसेच अखंड हरिनाम सप्ताह माध्यमातून होणाऱ्या भजन जागर या कार्यक्रमाच्या माध्यमातून सातत्याने धार्मिक संस्कृतीला पाठबळ देण्यासाठी सदैव कटीबद्ध असतात .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वस्त शंकरराव लामखडे यांनी केले शेवटी विश्वस्त संतोषशेठ रसाळ व बबनराव ससाणे यांनी आभार मानले.

# सात वर्षांच्या प्रतिक्षेनंतर पारगांवात अवतरली लाल परी!

## खा. नीलेश लंके यांनी केली विद्यार्थी, नागरीकांचे गैरसोय दूर

नगर : प्रतिनिधी

**खा. नीलेश लंके यांनी एस.टी.च्या नगरच्या विभागीय कार्यालयास पत्र दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी नगर तालुक्यातील भातोडी पारगांव येथे लाल परी अवतरली. तब्बल सात वर्षांच्या खंडानंतर खा. लंके यांच्या पुढाकारातून बस सुरू झाल्याने विद्यार्थी तसेच प्रवाशांनी समाधान व्यक्त केले.**

भातोडी पारगांव येथील सागर शिंदे, ग्रामपंचायत सदस्य महेश शिंदे, सचिन शिंदे, गणेश गुंड, प्रदीप शिंदे, प्रसाद पवार तसेच हमीद शेख यांनी गावाला पुन्हा एस टी बसची सेवा सुरू करण्याचे साकडे खा. नीलेश लंके यांना घातले होते. याकामी सुप्यातील पत्रकार समीर शेख यांनीही पाठपुरावा केला. खा. लंके यांच्याकडे ही मागणी केल्यानंतर त्यांनी तात्काळ विभागिय नियंत्रकांशी चर्चा करून या गावाला बस सुरू करण्यासंदर्भातील लेखी पत्रही लंके यांच्या संपर्क कार्यालयाकडून देण्यात आले. पत्र पोहचल्यानंतर त्याची तात्काळ दखल घेत दुसऱ्याच दिवसापासून भातोडी पारगांवला बस सुरू करण्यात आली.



### विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू

**शाळा, कॉलेजला जाण्यासाठी वाहन नसल्याने विद्यार्थ्यांना पायपीट करावी लागत होती. तब्बल सात वर्षे हा संघर्ष सुरु होता. विशेषतः विद्यार्थ्यांची ही अडचण दूर झाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर गावात बस येताच हसू खुलले.**

बसचे स्वागत करण्यासाठी माजी सरपंच शिवाजीदादा शिंदे, दिलीप शिंदे, विजय जगताप, दत्तात्रय तनपुरे, सुरज शिंदे, राजेंद्र शिंदे, गोविंद गुंड, ईश्वर शिंदे, महेश गुंड, श्रीरंग गुंड, दादासाहेब शिंदे, अमृत शिंदे, अश्विन जगताप, भारत शिंदे, सनी शिंदे, पिनू शिंदे, शुभ्मा गुंड, आकाश गुंड, पांडू शिंदे, पंढरीनाथ शिंदे, आदिनाथ सांगळे, गोरख शिंदे, दादा शिंदे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

### लालपरीचे विधिवत पुजन

सात वर्षांच्या कालखंडानंतर लाल परी गावात आल्याने भातोडी पारगावकरांच्या आनंदाला पारावार राहीला नाही. खा. लंके यांच्या पत्रानंतर दुसऱ्याच दिवशी बस येणार असल्याची माहीती समजल्यानंतर बसच्या स्वागतासाठी नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते. सुवासिनींनी बसचे विधीवत पुजन करीत स्वागत केले.

### खा.लंके यांच्या भेटीची विद्यार्थ्यांची इच्छा

सामाजिक कार्यकर्ते सचिन शिंदे यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या तिकीटचे पैसे स्वतः दिले. खा.लंके यांनी सोय करून दिल्याबद्दल विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. व लंके यांची भेट घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. लवकरच या विद्यार्थ्यांसोबत खा. लंके यांचा संवाद करून देण्याची जबाबदारी समीर शेख यांनी स्विकारली आहे.

# गजानन शेटे यांचे निधन

निघोज : प्रतिनिधी



**गजानन सदू शेटे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. धार्मिक कार्यात ते सातत्याने सहभागी असत.**

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी,सुना, नातू असा मोठा परिवार आहे. प्रगतीशील शेतकरी जालिंदर शेटे, गोरक्ष शेटे, जी.एस.महानगर बँकेचे वरिष्ठ अधिकारी मच्छिंद्र शेटे तसेच सत्यभामा बाळासाहेब तरटे यांचे ते वडील होत.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com